कार्यालयाची संक्षिप्त माहिती

[redacted]

## पंचायत समिती नायगाव (खै.)

## नायगाव तालुक्याची सर्वसाधारण माहिती

नायगाव (खै.) तालुका हा सन 2002 साली नव्याने स्थापन झालेला आहे.तालुक्याचे मुख्यालय हे नायगाव बाजार येथे आहे. नायगाव बाजार हे गाव जनावरांच्या बाजारासाठी पंचक्रोशीत प्रसिध्द आहे. नायगाव खै. हा नवनिर्मीत तालुका पुर्वीच्या बिलोली तालुक्याचे विभाजन होवुन 14 मार्च 2002 रोजी अस्तित्वात आला आहे.हा तालुका जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणापासुन दक्षिणेस 45 किलो मिटर अंतराव: आहे.

या तालुक्यामध्ये महसुली गावे 89 असुन (बेचिराग गावे 4 आहेत.बाभुळगाव ,इज्जतगाव म.सादकपुर ,ममन्याळ ) महसुली मंडळे 5 असुन (नायगाव ,नरसी,मांजरम,कुंटुर ,बरबडा ) तलाठी सज्जे 27 ,ग्रामपंचायती 80 (गट ग्रामपंचायत 5 ) ,नगर पंचायत 1(नायगाव) तालुक्याचे भौगोलीक क्षेत्र 57,238.00 एवढे असुन लागवडीलायक क्षेत्र 50,642.00 हेक्टर आहे.सन 2011 च्या जनगणनेनुसार स्त्री 88,955 व पुरूष 93,913 असे एकुण 1,82,868 एवढे आहे.तालुक्याचे सर्वसाधारण पर्जन्यमान 915 मि.मी.एवढे असुन तालुक्यात गोदावरी व मन्याड नदीचे खोरे लाभलेले आहे.

तालुक्यात 01 साखर कारखाना असुन कुंटुरकर शुगर प्रा.लि.मोहन नगर कुंटुर येथे आहे. पोलीस स्टेशन नायगाव व कुंटुर येथे आहे.जिल्हा परिषद गट 4 ( नरसी ,मांजरम,कुंटुर ,बरबडा ), पंचायत समिती गण 8 ( नरसी,मुगाव , मांजरम, टेंभुर्णी, कुंटुर, कोकलेगाव ,बरबडा, कृष्णुर) ,ग्रामीण रूग्णालय 1 (नायगाव बा.), प्राथमीक आरोग्य केंद्र 3(मांजरम , कुंटुर ,बरबडा) , पशुवैदकीय दवाखाने 4( नायगाव बा., बरबडा , मांजरम,कुंटुर) येथे आहे. जिल्हा परिषद शाळांची संख्या 107 असून त्यात 04 माध्यमिक शाळांची संख्या आहे. या तालुक्यातील मौजे गंगणबीड (तलबीड) येथील महादेव मंदिर प्रसिध्द आहे.नांदेड हैद्राबाद राज्य महामार्गावर मौजे घुंगराळा येथील पुरातन खंडोबा मंदिर प्रसिध्द असुन येथे दरवर्षी डिसेंबर महिन्यात यात्रा भरते.



Scanned with OKEN Scanner

तसेच या तालुक्या अंतर्गत गोदावरी नदी काठी मौजे राहेर येथेपुरातन हेमाडपंथी नृसिंह मंदिर आहे.त्यालगत भोवाळ समाजाचे दत्त मंदिर प्रसिध्द आहे.तसेच कोलंबी येथील दत्त संस्थान मठ प्रसिध्द असुन तेथे दरवर्षी दत्त जयंती महोत्सव साजरा केला जातो व तेथे यात्रा भरते तसेच नरसी येथील बालाजी मंदिर व रातोळी येथील रोकडेश्वर मंदिर प्रसिध्द आहे. तालुक्यातील मौजे बरबडा येथील लाल मिरची फार प्रसिध्द होती.नायगाव तालुक्यातील पंच तारांकीत औदयोगीक वसाहत मौजे कृष्णुर येथे औषधी, तेल ,मैदा, प्लायवुड तयार केले जातात व मोठया प्रमाणात कामगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

तालुक्याची जमीन काळी व सुपिक असुन मुख्य पिके सोयाबीन , ज्वारी ,कापुस, लाल मिरची ,उस ही प्रमुख पिके आहेत.तालुक्याच्या पुर्वेस बिलोली/,धर्माबाद , पश्चिमेस लोहा/ कंधार, दक्षिणेस मुखेड/ बिलोली व उत्तरेस मुदखेड व उमरी ही तालुके आहेत.



Scanned with OKEN Scanner

## कार्यालयीन संरचनेचा नमूना

गट विकास अधिकारी वर्ग-१

सहाय्यक गट विकास अधिकारी वर्ग-२

सहाय्यक प्रशासन अधिकारी

कनिष्ठ प्रशासन अधिकारी

शाखा अभियंता/कृषी अधिकारी/ क.अभियंता/ वि.अ/पंचायत./ कृषी /आरोग्य / सहाय्यक लेखा अधिकारी / कनिष्ठ लेखाधिकारी

कनिष्ठ प्रशासन अधिकारी

वरिष्ठ सहाय्यक / वरिष्ठ सहाय्यक (लेखा)

कनिष्ठ सहाय्यक

वाहन चालक

परिचर

वरिष्ठ सहाय्यक

कनिष्ठ सहाय्यक

ग्राम पंचायत अधिकारी/ग्रा वी अ

परिचर

Scanned with OKEN Scanner